**आदेश नि क्र. २२**

(दिनांक १३/०७/२०१६ )

१. प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये अर्जदारांना दाव्यात प्रतिवादी म्हणुन सामील करण्याकरिता दाखल करण्यात आला आहे.

२. मालेगांव तालुक्यातील किन्ही घोडमोड या गावी स्थित असलेली ग्रामपंचायत मालकीची जी जागा आहे तेथुन वादींना निष्कासित करु नये व त्यांचे ताबे वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये अशा प्रकारचा दावा वादीने दाखल केलेला आहे. मात्र सदरची जागा व त्या सभोवतालची जागा ही ग्रामपंचायतीने मागासवर्गीय समाज व बौध्द पंचमंडळ मिर्झापुर यांना ग्रामपंचायतीच्या ठरावा आधारे केलेली आहे, त्यामुळे दावा मिळकतीत प्रस्तुत अर्जदारांचे हक्क समाविष्ठ आहेत. म्हणुन दाव्याच्या वादाचे निराकरण होण्यासाठी प्रस्तुत अर्जदारांनी प्रतिवादी म्हणुन सामील करावे असा अर्ज करण्यात आला आहे.

३. वादीतर्फे नि.क्र. २७ लगत उत्तर सादर करण्यात आलेले असुन वाद मिळकतीबाबत अर्जदारांचा कशाप्रकारे हितसंबंध जोपासलेला आहे याचा उल्लेख केलेला नसल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज टिकाउ नाही असे कथन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे अर्जदारांच्या हितसंबंधाविषयी किंवा हक्क अधिकार दर्शविणारा कोणताही दस्ताऐवज अर्जदारांनी सादर केलेला नाही. वाद मिळकत अर्जदारांना कशाआधारे बहाल करण्यात आली आहे याचाही उल्लेख नाही. केवळ वादीला त्रास देण्याच्या गैरउद्देशाने प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आल्यामुळे तो खर्चासह नामंजुर व्हावा असा आक्षेप वादीतर्फे घेण्यात आलेला आहे.

४. दाव्यातील उभयपक्षांची कथने व कागदपत्रांचे अवलोकन केले, तसेच उभयपक्षातर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे विद्वान वकील श्री. पोफळे

यांचे असे कथन आहे की, दाव्यात नमुद मिळकत, त्याच्या चतु:सिमा याचेशी अर्जदारांनी संबोधित केलेल्या मिळकतीचा काहीही ताळमेळ लागत नाही. त्याचप्रकारे सदर वादमिळकत प्रस्तुत अर्जदारांना कोणत्याही सक्षम खात्याने बहाल केल्याबाबत दस्तऐवज अर्जदारांनी सादर केलेले नाही. त्याचप्रमाणे सदरचे अर्जदार हे मागासवर्गीय समाज व बौध्द पंचमंडळ मिर्झापुर याचे नोंदणीकृत सदस्य अथवा अधिकारी असल्याबाबत कोणताही कागद अर्जदारांनी सादर केलेला नाही. त्यामुळे अर्जदारांच्या अनुपस्थितीत देखिल प्रस्तुतचा दावा पुर्णपणे निकाली काढता येतो. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा, असे त्यांचे कथन आहे.

५. दाव्यासोबत वादीने दाखल केलेले कागदपत्रं पाहिले असता ग्रामपंचायत किन्ही घोडमोड—मिर्झापुर येथिल ८०X ४०= ३२०० ही जागा मागासवर्गीय समाज बौध्द पंचमंडळ मिर्झापुर यांचे नावाने आरक्षित असुन त्या जागेवर वादींनी अतिक्रमण केले असल्याचे ३ ते ४ कागदपत्रं स्वत: वादींनी दाखल केलेली आहेत. सदर जागेवर वादींचा कायदेशिर हक्क ताबा असल्याचा कोणताही कागद प्रकरणात दाखल केलेला नाही. याउलट नि.क्र. २९ लगत अर्जदारांनी जो ग्रामपंचायतीचा ठराव व नमुना ८ दाखल केलेला आहे त्यावरुन सदरच्या जागेमध्ये अर्जदारांचे हक्क, हितसंबंध असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. वाद जागेच्या ज्या चतु:सिमा वादींनी नमुद केल्या आहेत, तशाच प्रकारचा कच्चा हात नकाशा अर्जदारांनी दाखल केलेला आहे. त्यावरुन असे दिसते की, ग्रामपंचायत मालकीच्या ज्या जागेबाबत वादींनी दावा दाखल केला आहे त्याच मिळकतीबाबत अर्जदारांचेही हक्क, हितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळे अशा परिस्थितीत कायदयाची प्रक्रिया पाहता अर्जदारांच्या उपस्थितीतच दाव्यातील सर्व प्रश्नांचे पुर्णत व परिणामकारकरित्या निराकरण होवु शकेल या निष्कर्षास मी पोहचलो आहे. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. दिवाणी दावा क्र. ५१/२०१४ मधील नि.क्र. २३ लगतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने पुढील तारखेपर्यंत सदर प्रस्थावित प्रतिवादींना दाव्याची दुरुस्ती करुन प्रतिवादी क्र. ५ ते ९ म्हणुन सामील करावे व तदनंतर ६० दिवसाच्या आत सदर अर्जदारांनी त्यांची कैफियत सादर करावी.

स्वा/—

दिनांक १३/०७/२०१६

(एस.पी. देशमुख),
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाशिम

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/ Order are same word to word, as per the original Order.

Name of the Stenographer :- P. P. Karanjkar,
Stenographer(LG)

Court Name :- Civil Judge (Sr.Dn.), Washim

Date :- 13/07/2016

Order signed by the Presiding Officer on :- 13/07/2016

Order uploaded on :- 13/07/2016